४
सकाळ
सातारा : रविवार,
२ जुलै २००६

महसूल खात्यान छापासत्र सुरू केले.

# 'ॲग्रोवन'ला कृषी पत्रकारितेचा वसंतराव नाईक पुरस्कार प्रदान

## निंबकर कृषी संशोधन संस्थेलाही पुरस्कार

मुंबई, ता. १ : शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शेतीच्या अर्थकारणात महत्त्वपूर्ण बदल करून शेतीतील गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर वाढविण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी आज येथे केले. देशाच्या अर्थसंकल्पात दूरसंचार क्षेत्रासाठी पंधरा टक्के, शेतीसाठी केवळ अडीच टक्के व सिंचनासाठी फक्त ०.३५ (अर्धा टक्क्याहून कमी) अशी तरतूद असेल, तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशा थांबतील, असा थेट प्रश्न त्यांनी विचारला.

श्री. पवार यांच्या हस्ते वसंतराव नाईक कृषी संशोधन व ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वसंतराव नाईक कृषी पुरस्कारांचे वितरण झाले.

आजच्या कार्यक्रमात श्री. पवार यांच्या हस्ते फलटणच्या निंबकर कृषी संशोधन संस्थेला २५ हजार रुपयांचा सामाईक पुरस्कार देण्यात आला. डॉ. नंदिनी निंबकर यांनी तो स्वीकारला. त्याखेरीज प्रत्येकी ११ हजार रुपयांचे नऊ पुरस्कार पवार यांच्या हस्ते देण्यात आले. 'सकाळ' वृत्तपत्रसमूहाच्या 'ॲग्रोवन'ला कृषी पत्रकारितेचा पुरस्कार मिळाला. 'ॲग्रोवन'चे संपादक निशिकांत भालेराव यांनी तो स्वीकारला. इतर पुरस्कारविजेते असे : महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजाराम देशमुख (कृषी), विश्वासराव कचरे (फलोत्पादन), वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ (पशुपालन व दुग्धविकास), संजय चांगदेव होळकर (कृषी निर्यात), सूर्यकांत जोग (जलसंधारण), राजेंद्र चुरी (भाजीपाला उत्पादन), गणेश लक्ष्मणराव मात्रे (कृषिप्रक्रिया उद्योग).